**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांची दूरस्थ पद्धतीनं पायाभरणी आणि उद्घाटन
- मराठी पत्रकारिता दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रम
- मस्साजोगच्या सरपंच हत्येप्रकरणी निःपक्षपाती तपासाची सर्वपक्षीय नेत्यांची राज्यपालांकडे मागणी
- कर्नाटकात एचएमपीव्हीचे २ रुग्ण आढळल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यात आरोग्य यंत्रणा सतर्क

**आणि**

- महिला क्रिकेटमधे आयर्लंडविरुद्ध एकदिवसीय मालिकेसाठी भारताचा संघ जाहीर

**<><><><><>**

गेल्या दशकभरात भारतीय रेल्वेचा चेहरामोहरा बदलून गेला असून रेल्वेच्या प्रगतीमुळे विकसित भारताचं उद्दिष्ट लवकर गाठण्यात मदत होईल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनं आज दूरस्थ पद्धतीनं केली, त्यावेळी ते बोलत होते. पायाभूत सुविधांचा विकास, प्रवाशांना आधुनिक सोयी सुविधा देणं, रेल्वेचं देशभरातील जाळे अधिक वाढवणं, आणि या सर्वांमधून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणं अशा चार मार्गांनी भारतीय रेल्वेचा विकास करण्याचं सरकारच धोरण असल्याचं त्यांनी सांगितलं.

काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत दळणवळण आणि पायाभूत सुविधा विकासाला चालना देणाऱ्या या प्रकल्पांमधे नव्या जम्मू रेल्वे विभागाचं आणि तेलंगणातल्या नवीन चार्लापल्ली टर्मिनसचं उद्घाटन, तसंच पूर्व किनारपट्टी रेल्वेच्या ओडिशातल्या रायगडा रेल्वे विभागाच्या इमारतीची पायाभरणी त्यांच्या हस्ते झाली. देशातल्या तीन राज्यांमध्ये विकसित होत असलेल्या या प्रकल्पांच्या माध्यमातून देश जोडला जात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी भाषणात सांगितलं....

रेल्वे तसंच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, तसंच मुख्यमंत्री ओमार अब्दुल्ला, तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी तसंच या दोन्ही राज्यांचे राज्यपाल इत्यादी मान्यवरांनी कार्यक्रमात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून भाग घेतला. दळणवळणाच्या सुविधा विकसित होत असल्याबद्दल या राज्यांचं प्रधानमंत्र्यांनी भाषणात अभिनंदन केलं.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज अर्थसंकल्पपूर्व चर्चेसाठी आठवी बैठक नवी दिल्लीत घेतली. आजच्या बैठकीत विविध संबंधित घटकांच्या प्रतिनिधींसह कामगार संघटनांचे प्रतिनिधी देखील सहभागी झाले होते.

**<><><><><>**

पायाभूत सुविधा विकासात महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असून, देशात सर्वाधिक पायाभूत विकासाची कामं राज्यात सुरू आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. राज्यात विविध ठिकाणी महारेलनं उभारलेल्या ७ उड्डाणपुलांचं नागपुरातून लोकार्पण करताना ते बोलत होते.

एका बाजूला केंद्र शासनाचे विविध प्रकल्प आणि दुसऱ्या बाजूला महाराष्ट्र शासनानं हाती घेतलेले विविध प्रकल्प यातून समृध्द महाराष्ट्र घडत आहे. येत्या काळात महारेल मार्फत २०० रेल्वे उड्डाणपूल आणि भुयारी मार्गाची कामं पूर्ण केली जात आहेत. राज्यात मेट्रो, राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग, विमानतळ विकास, बंदरांचा विकास अशा सर्व क्षेत्रात आपण दूरदृष्टी ठेवून विकास कामं हाती घेतली आहेत, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

पंचायत से पार्लमेंट टू पॉईंट झीरो या कार्यक्रमाचं उद्घाटन लोकसभेचे सभापती ओम बिरला याच्या हस्ते आज नवी दिल्लीच्या संविधान सदनात झालं. आत्मनिर्भर भारताचं स्वप्न साकारण्यासाठी तसंच महिलांना आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या सबल बनवण्यासाठी पंचायती राज संस्था महत्त्वाची भूमिका निभावत आहेत असं बिरला यावेळी म्हणाले. महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांचंही भाषण कार्यक्रमात झालं. केंद्रसरकारच्या कल्याणकारी योजना पंचायती राज संस्थांशी निगडित महिलांमार्फत तळागाळात पोहोचत आहेत असं त्या म्हणाल्या. २० राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून पंचायती राज संस्थांमधल्या सुमारे ५०० महिला प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी झाल्या आहेत.

**<><><><><>**

मराठी पत्रकारिता दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत. मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जंयती आणि त्यांनी दर्पण हे पहिलं मराठी नियतकालिक सुरु केलं तो ६ जानेवारीचा दिवस दरवर्षी मराठी पत्रकारिता दिन म्हणून साजरा केला जातो. पत्रकार दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस, तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकरांना आदरांजली वाहिली आहे.

मुंबई मराठी पत्रकार संघात पत्रकार दिनानिमित्त आज संध्याकाळी आयोजित कार्यक्रमात पत्रकारितेसाठीच्या विविध पुरस्कारांचं वितरण, तसंच दिनदर्शिकेचं प्रकाशन केलं जाणार आहे.

पुण्यात काल मराठी पत्रकार संघानं राज्यातल्या पहिल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स मीडिया हॅकॅथॉनचं आयोजन केलं होतं. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यावेळी उपस्थित होते. पत्रकार संघटनेनं यावर्षीच्या पत्रकार दिनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता ही भविष्यवेधी संकल्पना निवडली आहे.

नाशिक जिल्ह्यात पत्रकार दिनानिमत्त वेगवेगळ्या संस्थांनी विविध कार्यक्रमांद्वारे बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याला उजाळा दिला. नाशिक शहर पत्रकार संघानं आमदार देवयानी फरांदे आणि इतर मान्यवरांच्या हस्ते पत्रकारांचा सन्मान केला.

रत्नागिरीत पत्रकार दिनानिमित्त 'द पॉवर ऑफ मीडिया फाउंडेशन'नं 'स्पर्धा परीक्षा म्हणजे काय' या विषयावर रत्नागिरीचे पोलीस उपअधीक्षक नीलेश माईणकर यांचं व्याख्यान आयोजित केलं होतं. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचं पूजन करण्यात आलं.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी निःपक्षपाती तपासाची मागणी घेऊन सर्वपक्षीय नेत्यांच्या शिष्टमंडळाने आज मुंबईत राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेतली. तपास पूर्ण होईपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा तसंच वाल्मिक कराड यांच्यावर हत्येचा गुन्हा नोंदविला

जावा तसेच तपास पथकात निष्पक्ष अधिकाऱ्यांचा समावेश करण्याची मागणी शिष्टमंडळानं केली.

**<><><><><>**

कर्नाटकात ह्युमन मेटान्यूमो व्हायरस एचएमपीव्हीचे दोन रुग्ण आढळल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यात आरोग्य यंत्रणा सतर्क करण्यात आली आहे. सर्दी - खोकल्याच्या रुग्णांचं सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत तसंच स्वच्छतेसंबंधी नियमावली जाहीर केली आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर गुरुवारी आरोग्य विभागाची महत्त्वाची बैठक घेणार आहेत. त्यात एचएमपीव्ही विषाणूबाबत आणि त्याच्या तीव्रतेबाबत तसचं खबरदारीच्या उपायांबाबत चर्चा करण्यात येणार आहे.

विविध देशांमध्ये एचएमपीव्हीशी संबंधित श्वसनाच्या आजाराचे रुग्ण सापडत आहेत. देशात इन्फ्लूएंझासदृश आजार किंवा गंभीर तीव्र श्वसन आजारात वाढ झालेली नाही. देशात श्वसनाच्या आजारांमध्ये होणारी संभाव्य वाढ हाताळण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज असल्याचं तसचं परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं सांगितलं. चीनमध्ये एचएमपीव्हीच्या वाढत्या प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटना अद्ययावत माहिती देत आहे.

कर्नाटकात ह्युमन मेटान्यूमो व्हायरस एचएमपीव्हीचे दोन रुग्ण आढळले आहेत. यात तीन महिन्यांच्या मुलीचा आणि आठ महिन्यांच्या मुलाचा समावेश आहे. दोघांवर उपचार सुरु असून बाधित रुग्णांपैकी एकानेही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही.

**<><><><><>**

शिखांचे दहावे गुरू, गुरू गोविंदसिंह यांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र प्रकाश पर्व साजरं करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुरु गोविंद सिंह यांना आदरांजली अर्पण केली आहे. मानवतेच्या कल्याणासाठी गुरु गोविंद सिंह यांनी केलेलं कार्य सर्वांना प्रेरणादायी असल्याचं राष्ट्रपतींनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

प्रकाश पर्वानिमित्त ठिकठिकाणच्या गुरुद्वारांमधे विशेष प्रार्थना आयोजित करण्यात आल्या आहेत. तसंच गुरु गोविंदसिंगाच्या प्रतिमांचे जुलूस निघाले आहेत. नांदेडच्या सचखंड गुरुद्वारातही प्रकाश पर्वानिमित्त भाविकांची गर्दी झाली आहे.

**<><><><><>**

मनोरंजन विश्वात मानाच्या समजल्या जाणाऱ्या गोल्डन ग्लोब पुरस्काराच्या शर्यतीतून भारताचा  पायल कपाडिया दिग्दर्शित 'ऑल वी इमेजिन एज लाइट'  हा चित्रपट बाहेर पडला असून हा पुरस्कार जाक ओडियार्ड दिग्दर्शित ‘एमेलिया पेरेज’ स्पॅनिश या चित्रपटाला जाहीर झाला आहे.

गोल्डन ग्लोब पुरस्कारातल्या इंग्रजी सोडून इतर भाषांमधल्या चित्रपटांसाठीच्या विभागात उत्कृष्ट चित्रपटासाठी अंतिम मानांकनात भारतीय चित्रपटाला जागा मिळण्याची ही पहिलीच वेळ असून उत्कृष्ट दिग्दर्शकांसाठीच्या नामांकनात याच चित्रपटाच्या दिग्दर्शिका पायल कपाडिया यांनाही मानाचं स्थान मिळालं आहे. नुकत्याच पार पडलेल्या प्रतिष्ठेच्या कान महोत्सवात प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांची पसंती मिळाली होती .

**<><><><><>**

आयर्लंडविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं १५ सदस्यीय महिला संघाची घोषणा केली आहे. स्मृती मंधानाची कर्णधार आणि दीप्ती शर्माची उपकर्णधार म्हणून तर यष्टीरक्षक म्हणून ऋचा घोष आणि उमा छेत्री यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संघात प्रतिका रावल, हरलीन देओल, जेमिमा रॉड्रिग्ज, तेजल हसबनीस, राघवी बिस्ट, मिन्नू मणी, प्रिया मिश्रा, तनुजा कानवर, तितास साधू, सायमा ठाकोर आणि सायली सातघरे यांचा समावेश आहे. मालिकेला १० जानेवारीपासून सुरुवात होणार असून अंतिम सामना १५ जानेवारीला होणार आहे. सर्व सामने राजकोटच्या निरंजन शाह स्टेडियमवर खेळले जातील.

**//<><><><><>//**